MHCO300000852025

दाखल दिनांक : २०.०२.२०२५

नोंदणी दिनांक : २०.०२.२०२५

निकाल दिनांक : ०८.०७.२०२६

कालावधी : वर्षे महिने दिवस
०१ ०४ १८

## न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालय.

(पिठासीन अधिकारी – श्री. व्हि. व्हि. जोशी)

सहकार दावा क्र.८१/२०२५. निशाणी क्र.१८.

सावित्रीबाई फुले महिला नगरी सहकारी पतसंस्था }
मर्या. शेगाव र.नं.९७१, फुले नगर, माळीपुरा, शेगाव, } वादी...
ता.शेगाव, जि.बुलढाणा, तर्फे विशेष वसुली आणि }
विक्री अधिकारी श्री रविंद्र सारंगधर मसने, }
वय– ४०, कामधंदा–नोकरी, रा.दसरा नगर, शेगाव, }
ता.शेगाव, जि.बुलढाणा. }

:: विरुध्द ::

१} श्री.गजानन चंद्रभान हाडोळे, }
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय, }

२} श्री.सुनिल सारंगधर पेटकर, }
वय : ४० वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय, }
प्रतिवादी क्र.१ व २ रा. फुले नगर, }
शेगाव, ता.शेगाव, जिल्हा बुलढाणा. }

३} श्री.गजानन नारायण हुसे, }

०८/०७/२६.

वय : ५५ वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय, }
रा.गणेश नगर, शेगाव, ता.शेगाव, जि.बुलढाणा. } प्रतिवादी...

दावा :- रक्कम रु.६४,११९/- वसुलीकरीता..

---

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे विद्वान वकील | – | श्री. पी.के. धनोकार, |
| प्रतिवादी क्र.१ तर्फे | – | स्वत: हजर, |

(प्रतिवादी क्र.१ विरूध्द दावा विना लेखी जबाब चालविण्यात आला.)

| | | |
|---|---|---|
| प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे | – | दावा एकतर्फी चालविण्यात आला. |

---

## – निकालपत्र –

(आज दिनांक ०८ जुलै, २०२६ रोजी पारीत)

१. वादी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत रजिष्टर असुन प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक १६.०६.२०२१ रोजी रक्कम रु.३५,०००/- चे कर्ज घेतले.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामिनदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ने कर्ज रकमेवर द.सा.द.शे.१३ टक्के प्रमाणे वा संस्था वेळोवेळी ठरवील, त्याप्रमाणे व्याज देण्याचे मान्य केले. प्रतिवादींनी वादीच्या हक्कात कर्ज कागदपत्रे करुन दिले.

३. खातेउता-याप्रमाणे दिनांक १५.०२.२०२५ अखेर रक्कम रु.६३,११९/- प्रतिवादी क्र.१ कडे बाकी आहेत. त्यामुळे, वादीने ती रक्कम व इतर खर्च मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र.१ दाव्यात हजर झाले पण त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. तसेच, प्रतिवादी क्र.२ व ३ दाव्यात हजर झाले नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१

08/07/26

विरूध्द विना लेखी जबाब व प्रतिवादी क्र.२ व ३ विरुद्ध निशाणी क्र.१ वर एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

५. प्रस्तुतचा दावा व दाखल केलेल्या दस्ताऐवजांच्या अनुषंगाने वादीचे विद्वान वकील यांचा तोंडी युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी किंवा त्यांच्या वतीने त्यांचे विद्वान वकिल युक्तिवाद करण्याकरिता हजर नसल्यामुळे प्रतिवादींच्या युक्तीवादाशिवाय प्रकरण पुढे चालविण्यात आले.

६. वादीच्या वादपत्रावरुन विचाराधीन मुद्दे व त्या मुद्यांना मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे उत्तरे दिलीत ते खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करते काय की, प्रतिवादी हे व्यक्तीगत व सामुहिकरित्या रु.६३,११९/- द.सा.द.शे.१३ टक्के प्रमाणे व टायपींग खर्च रु.१०००/- एवढी रक्कम परतफेड करण्यास जबाबदार आहेत ? | ...अंशत: होकारार्थी... |
| २. | आदेश व हुकुमनामा काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे... |

...का र ण मि मां सा...

विचाराधीन मुद्दा क्र.१ करिता -

७. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द कर्ज वसुलीसाठी दाखल केला असुन वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी रु.३५,०००/- कर्जाची उचल केली. वादीने दाव्यातील कथनांच्या पुष्ट्यार्थ संस्थेचे अधिकारी श्री रविंद्र सारंगधर मसने यांचे शपथपत्र दाखल केले. शपथपत्रातील मजकुर हा दाव्यातील मजकुराशी सुसंगत आहे.

८. वादीने ठराव (निशाणी क्र.१०), कर्ज मागणी अर्ज (निशाणी क्र.११), जामिनादाराचे माहीती पत्रक (निशाणी क्र.१२ व १३), करारपत्र (निशाणी क्र.१४), वचनचिठ्ठी (निशाणी क्र.१५), कलम-६५-ब चे प्रमाणपत्र (निशाणी क्र.१६) व

08/07/26

खातेउतारा (निशाणी क्र.१७) अभिलेखावर दाखल केले. दाव्यात दाखल कागदपत्रांवरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी कर्ज रु.३५,०००/- वादीकडून घेतले व सदर कर्जास प्रतिवादी क्र.२ व ३ जामीनदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ गैरहजर आहेत व त्यांच्याविरूद्ध एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. वादीच्या पुराव्याला प्रतिवादींनी आव्हान दिले नाही. याउलट प्रतिवादींनी वादीचे कथन खोटे असल्याबाबत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर सादर केला नाही, इतकेच नव्हे तर प्रतिवादींनी स्वत:ची साक्ष देखिल नोंदविली नाही.

९. वादीने दाव्यातील रक्कम सिध्द करण्याकरीता खातेउतारा (निशाणी क्र.१७) दाखल केला. सदरच्या खातेउताऱ्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ कडे दिनांक १५.०२.२०२५ अखेर रक्कम रु.६३,११९/- बाकी असल्याचे दिसुन येते. वादीने दाव्यात द.सा.द.शे.१३ टक्के व्याजाची मागणी केली. तसेच, करारपत्र (निशाणी क्र.१४) व वचनचिठ्ठी (निशाणी क्र.१५) मध्ये द.सा.द.शे.१३ टक्के व्याजाचा उल्लेख आहे. त्यामुळे, वादी द.सा.द.शे.१३ टक्के प्रमाणे व्याज आकारणीस हकदार आहे. प्रस्तुत प्रकरणातील खातेउतारा (निशाणी क्र.१७) चे गांभिर्याने अवलोकन केले असता सदरच्या खातेऊता-यामध्ये वादी संस्थेतर्फे प्रतिवादी क्र.१ कडुन संस्थेच्या खातेऊता-यामध्ये नोटीस शुल्क व इतर शुल्क लादुन एकुण रु.९,०००/- अशा एकंदरित खर्चाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे, वादी संस्थेने मागणी केल्याप्रमाणे रु.६३,११९/- वजा रु.९,०००/- म्हणजे एकुण रु.५४,११९/- एवढी रक्कम वादी संस्थेची प्रतिवादी क्र.१ कडे थकीत असल्याचे स्पष्ट व सिध्द होते. तसेच, वादीने रु.१,०००/- टायपींग खर्चाची मागणी केली आहे. परंतु वादीने त्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे, वादी केवळ दाव्याचा किरकोळ खर्च मिळविण्यास पात्र आहे, असे माझे मत आहे. वरील कारणास्तव वादीचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुद्ध अंशत: मंजुर करण्यात येतो, म्हणुन मी **विचाराधीन मुद्दा क्र.१ ला अंशत: होकारार्थी** असे उत्तर देतो.

08/07/26

**मुद्दा क्र.२ करिता –**

१०. मुद्दा क्र.१ ला दिलेल्या उत्तरांमुळे मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे तो येणेप्रमाणे :--

**:: आदेश ::**

१) वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी व्यक्तीगत व सामुहिकरित्या रक्कम रु.५४,११९/– इतकी रक्कम व कर्जाची मुळ रक्कम रु.३५,०००/– वर द.सा.द.शे.एकुण १३ टक्के प्रमाणे व्याज दावा दाखल केल्याच्या तारखेपासून म्हणजे दिनांक २०.०२.२०२५ ते पुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत वादीला द्यावे.

३) त्याप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषीत करण्यात आला.)

08/07/26.

**दिनांक – ०८.०७.२०२६**
**ठिकाण – अकोला.**

**{व्हि.व्हि. जोशी}**
**न्यायाधिश**
**सहकार न्यायालय, अकोला.**